Yashoda Shikshan Prasarak Mandal's
YASHODA TECHNICAL CAMPUS, SATARA
NH-4, Wadhe Phata, Satara., Tele - 02162-271238/39/40
Website- https://www.yes.edu.in,,Email-registrar_ytc@yes.edu.in
Approved by PCI- New Delhi, Govt. of Maharashtra (DTE, Mumbai)
Affiliated to D Batu University, Lonere , Shivaji University, Kolhapur
MSBTE, Mumbai. Mobile No:- 9172220775

YSPM
NAAC B+

**Prof. Dasharath Sagare**
**Founder, President**

**Dr. G. K. Suravase**
**Registrar**

Ref. No.:-YSPM/YCP/ ADMIN/ २०९ /2025-26

**Date:-02/ 03 / 2026**

# नोटीस

य शोदा इन्स्टिट्यूट मधील सर्व **जुन्या तसेच नवीन** शैक्षणिक वर्ष २०२५–२६ प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, जे विद्यार्थी भटक्या जाती व जमाती फक्त धनगर समाजाजील प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेश मिळाला नाही व भाडयाने राहत असलेल्या **"स्वंयम"** योजना शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की,सदर योजनेसाठी **https://hmas.mahait.org** या संकेतस्थळावर **ऑनलाईन व ऑफलाईन** या दोन्ही पध्दतीत शिष्यवृत्तीचा अर्ज सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण समाजकल्याण, विभाग सातारा यांच्याकडून **अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.** यांच्याकडे महाविद्यालयामार्फत दि. १०/०३/२०२६ पर्यंत जमा करावयाचे आहेत, तरी पात्र इच्छुक विद्यार्थ्यांनी तात्काळ आपले वस्तीगृह शिष्यवृत्तीचे अर्ज भरून योग्य कागदपत्रासह महाविद्यालयातील शिष्यवृत्ती विभागाकडे जमा करावेत. जे विद्यार्थी वेळेत अर्ज भरणार नाहीत अशा विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी.

Yashoda Technical Campus Satara 6757

**Registrar**
**Yashoda Technical Campus**
**Satara**

सोबत:– १) योजना कागदपत्र चेकलिस्ट
२) GR माहीतीसाठी जोडत आहे.
३)संकेतस्थळ – https://hmas.mahait.org

# आधार व स्वयंम योजना २०२५-२६ कागदपत्र चेकलिस्ट

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|
| १ | विदयार्थ्याचा ऑनलाईन प्रणालीवरील अर्ज | |
| २ | १० वी गुणपत्रक | |
| ३ | १२ वी गुणपत्रक | |
| ४ | मार्च २०२६ पर्यंत वैध असणारा उत्पन्नाचा दाखला | |
| ५ | जातीचा दाखला | |
| ६ | जात वैधता प्रमाणपत्र | |
| ७ | रहिवासी दाखला | |
| ८ | मागील वर्षीचे (सन २०२४-२५ )गुणपत्रक/महाविदयालयाचे लेखी पत्र | |
| ९ | सन २०२५-२६ चे बोनाफाईड प्रमाणपत्र/प्रवेशाची पावती | |
| १० | सन २०२५-२६ ची महाविदयालयाची उपस्थिती | |
| ११ | विदयार्थ्याचे कॅप राऊंड लेटर | |
| १२ | शाळा सोडल्याचा दाखला | |
| १३ | विदयार्थी स्थानिक रहिवासी नसल्याचे प्रमाणपत्र | |
| १४ | विदयार्थी शासकीय वसतीगृहात राहत नसल्याचे प्रमाणपत्र | |
| १५ | विदयार्थ्याचा चालू वर्षीचा भाडे करारनामा/वसतीगृह प्रमाणपत्र | |
| १६ | भाडे पावती/वसतीगृह फी भरल्याची पावती | |
| १७ | गॅप सर्टिफीकेट लागू असल्यास | |
| १८ | विदयार्थ्याचे आधार कार्ड | |
| १९ | विदयार्थी बँक पासबुक | |
| २० | आधार व बँक लिंक केल्याचा पुरावा | |

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,
आकार प्रिमायसेस, दुसरा मजला, एम.एच.बी.कॉलनी,
शास्त्रीनगर, येरवडा पुणे - ४११ ००६
दूरध्वनी क्र. २०-२६०५५१८५ ई-मेल- dvjntobcsbcwpune@gmail.com

क्रमांक २०२५/इमावबकसं/शा.व.स्वं.आ/वेळापत्रक/२०२५ -२६/ ११५० दि.२३.०२.२०२६ 28

प्रति,

१. प्रादेशिक उपसंचालक (सर्व),

२. सहायक संचालक (सर्व),
इतर मागास बहुजन कल्याण विभाग

**विषय:- राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेतंर्गत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रकात मुदतवाढ देणेबाबत...**

संदर्भ:-

१. या कार्यालयाचे पत्र क्र.३७४४ दि.२१.७.२०२५.
२. या कार्यालयाचे पत्र क्र.३८७३ दि.३०.७.२०२५, पत्र क्र.४२२६ दि.१४.८. २०२५ व पत्र क्र.४४७१ दि.३.९.२०२५.
३. या कार्यालयाचे पत्र क्र.६६५ दि.०४.०२.२०२६.

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह, आधार व स्वयंम या योजना १२ च्या नंतर व्यावसायिक व अव्यावसायिक शिक्षण घेणा-या राबविण्यात येतात. या योजनेची प्रवेश प्रक्रिया Online राबविण्यासाठी वसतीगृह प्रवेश प्रणाली कार्यन्वित करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.२ व ३ चे पत्रान्वये राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाळ योजनेतंर्गत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रकातील बदलाबाबत वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबवुनही अद्यापही अनेक जिल्ह्यामध्ये रिक्त जागा दिसून येत आहेत.

करिता आपणास सुचित करण्यात येते की, ज्या जिल्हयांच्या वसतीगृहात निवड यादीनुसार प्रवेश देऊनही अद्याप जागा रिक्त आहेत अशा जिल्ह्यांनी प्रथम, व्दितीय, तृतीय व चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी पुढीलप्रमाणे मुदतवाढ देऊन वेळापत्रक देण्यात येत आहे. सदर वेळापत्रकाप्रमाणे वसतीगृहात प्रवेश देण्याच्या अनुषंगाने योग्य ती नियमाधीन कार्यवाही अनुसरावी.

**शासकीय वसतीगृह/ स्वयंम व आधार सन २०२५-२०२६ साठीचे प्रवेशाचे वेळापत्रक**

| बाब | प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी | निवड यादी गुणवत्तेनुसार अंतिम करणे व प्रसिध्द करणे | निवड यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| बी.ए./बी.कॉम/बी.एस.सी. अशा १२ वी नंतरच्या उच्च शिक्षण घेण्या-या **व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी** | दि. २५.०२.२०२६ ते दि. १०.०३.२०२६ | दि. ११.०३.२०२६ | दि. १२.०३.२०२६ ते दि. २०.०३.२०२६ |

**प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.**

- सदरहू योजनांच्या प्रवेशप्रक्रियेबाबत राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीय वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देवून याबाबतची प्रसिध्दी द्यावी.
- सदरहू वेळापत्रकाची सविस्तर नोटीस / सूचना प्रत्येक सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण / प्रादेशिक उप संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय तसेच प्रत्येक शासकीय वसतीगृह आणि सदर वसतीगृहाच्या परिसरातील सर्व महाविद्यालयांच्या सूचना फलकावरही प्रदर्शित करावी. सदर प्रसिध्दी देताना सन २०२५-२६ मध्ये जिल्हानिहाय व वसतीगृहनिहाय व प्रवर्गनिहाय किती जागा रिक्त आहेत हे स्पष्ट नमूद करावे.
- तसेच जिल्हयातील महाविद्यालयांच्या नोटीस बोर्डवर सदरहू प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक लावण्याबाबत, त्यासोबतच विविध सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर सदरहू प्रवेश प्रक्रियेचा प्रसार करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.
- प्रवेश प्रक्रिया सुरळीत व व्यवस्थित होणेसाठी सर्व संबंधित सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी सर्व संबंधित कर्मचारी अधिकाऱ्यांची बैठक घेवून त्यांना सविस्तर सूचना निर्गमित कराव्यात.
- प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या बँकेचे खाते क्रमांक, आधार क्रमांक, बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न करुन घेण्याची जबाबदारी गृहपालांची असेल, या बाबीकडे विशेष लक्ष द्यावे.
- सर्व प्रवेश प्रक्रिया शासकीय वसतीगृहनिहाय करावी. अंतिम निवड यादीस नियमानुसार संबंधित सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी मान्यता प्रदान करावी.
- सर्व शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांचे प्रवेश सन २०२५-२६ या वर्षासाठी ऑनलाईन पध्दतीने करावेत. सदर अर्ज https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर करण्यात यावेत.
- सदरहू योजनांची प्रवेश प्रक्रिया राबविताना शासनाच्या प्रचलित धोरणांचा, शासन निर्णयांचा, शासन परिपत्रक व इतर अनुषंगिक अटी शर्तीचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.
- सदर योजनेची व्यापक प्रसिद्धी करण्याकरिता प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांच्याकडे पाठपुरावा करावा. तसेच, सदरच्या प्रवेश प्रक्रियेवर नियंत्रण ठेवावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

(प्रशांत शिर्के)
संचालक
**इतर मागास बहुजन कल्याण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत :-**

१. मा.सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग,मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.
२. प्रकल्प व्यवस्थापक महा आयटी, मुंबई यांना सुचित करण्यात येते कि त्यांनी वसतीगृह प्रवेश प्रणालीवर उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे सुविधा (टॅब) उपलब्ध करुन द्यावा.